


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ

Mob- 9822720784 Email- jansanchlan@gmail.com

वर्ष ३ रे | अंक : ७८०. वा | गुरुवार | दि. २३ मे २०२४ | पृष्ठ ८ | किंमत ३ रुपये

# इंडिया आघाडीची कामगिरी चांगली, देशात सरकार आम्हीच स्थापन करणार- मल्लिकार्जुन खर्गे

**वृत्तसंस्था/ नवी दिल्ली**

इंडिया आघाडी २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत चांगली कामगिरी करत आहे. महा-गाई, बेरोजगारी, भीतीचे वातावरण, लोकशाहीवर घाला हे मुद्दे मतदारांना आकर्षित करण्यासाठी आम्हाला महत्वाचे ठरले. भाजपा आता पुन्हा सत्तेत येऊच शकत नाही, विरोधक देशात आपलं स्थिर सरकार स्थापन करणार आहेत, असे वक्तव्य काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी केले आहे. देशभरात पाचव्या टप्प्यापर्यंतचे मतदान पार पडले आहे. यादरम्यान इंडिया आघाडी आणि एनडीएच्या धुरिणांनी सर्वत्र आपली ताकद लावलेली पाहायला मिळालं. भाजपा सत्तेत कायम राहण्यासाठी आगामी वर्षातील विकासाच्या मुद्द्यांवर मतदारांना साद घालत आहे तर इंडिया आघाडीतील पक्ष जनतेच्या प्रश्नांवर आणि मोदी सरकारच्या अपयशावर हल्ला चढवत मतदारांना आकर्षित करत आहेत. यातच काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी इंडिया आघाडीचंच देशात सरकार येणार असल्याचे स्पष्ट केले आहे.मल्लिकार्जुन खर्गे यांनी टाइम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत देशा-तील लोकसभा निवडणूकीच्या निकालावर भाष्य केले आहे. खर्गे म्हणाले, २०१९ च्या तुलनेत ही निवडणूक इंडिया आघाडीसाठी चांगली होती, आम्हाला देशात चांगले बहुमत मिळेल. आणि आम्हाला आत्मविश्वास आहे की, भाजपाला हरवू आणि त्यांना सत्तेत येण्यापासून रोखू. जन-ताच सांगते की जनता ही निवडणूक लढण्यासाठी समोर येत आहे आणि आम्ही त्यांना मदत करत आहोत. त्यामुळे भाजपाचा ४०० पारचा दावा हा पूर्ण होणं अशक्य आहे. पंतप्रधान आ-पली प्रतिमा लोकांमध्ये बनून राहावी म्हणून असे फोल दावे करत आहेत.लोक सांगतात ते महागाईने त्रस्त आहेत. आतापर्यंत ज्या युवा



वर्गाचा कल भाजपाकडे होता, त्याच युवावर्गाची देखील भाजपाबद्दल तक्रार आहे. ते सांगतात की, आमच्याकडे जगण्यासाठी मुलभूत गरजांची देखील सोय नाही तर मग आम्ही काय करावं? तसेच दलित, आदिवासी, उपेक्षित जनतेमध्ये देखील भाजपा संविधान बदलणार असल्याची भीती आहे. जनतेने आता देशाचं संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी बिगर-भाजप पक्ष आणण्याचा निर्धार केलेला आहे. असा विश्वास देखील मल्लिकार्जुन खर्गे यांनी व्यक्त केला आहे.

# उद्योग पूरक वातावरण करून निर्यात वाढविणार-जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील

## निर्यात कक्ष स्थापन करण्यात येणार व रिक्त भूखंडाचे वाटप होणार

**जनसंचलन/बुलढाणा**

जिल्ह्याची उत्पादकता देशाच्या सरासरीपेक्षा जास्त आहे. या उत्पादनक्षम असलेल्या जिल्ह्यात प्रामुख्याने कृषि माला-वरील प्रक्रिया उद्योग उभारणीस वाव आहे. उद्योग करण्यास पुढाकार घेणाऱ्या उद्योजकांना जिल्हा प्रशासनातर्फे संपूर्ण पुढाकार व सहकार्य करण्यात येत आहे. तसेच जिल्ह्यात उद्यो-गपूरक वातावरण तयार करून निर्यातील चालना देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली. निर्यात प्रचलन समिती, आजारी उद्योग आणि स्थानिकांना रोजगार मिळविण्यासाठी बैठक घेण्यात आली. यावेळी जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रमोद लांडे, व्यवस्थापक सुनील पाटील, औद्योगिक विकास महामंडळाचे क्षेत्र व्यवस्थापक श्री. राऊत, नाबार्डचे सहायक महाप्रबंधक रोहित गाडे, जिल्हा अग्रणी बँक व्यवस्थापक के. के. सिंग यांच्यासह जिल्ह्यातील उद्योजक उपस्थित होते. जिल्हाधिकारी डॉ. पाटील म्हणाले, जिल्ह्यात निर्यातक्षम उद्योग उभारणीसाठी समोर येणाऱ्या प्रत्येक उद्योजकाला सर्वतोपरी सहकार्य केले जात आहे. त्यासोबतच नागपूर येथील केंद्र शासनाच्या विदेश व्यापार महासंचालनालयाच्या सहकार्याने येत्या काळात जिल्ह्यात निर्यात कक्ष स्थापन करण्यात येणार आहे. याबाबतची प्राथमिक बोलणी झाली आहे. या कक्षाचा लाभ स्थानिक उद्योजकांना होणार असून जिल्ह्यातील निर्यात वाढण्यास मदत होईल. गेल्या वर्षी ७६८ कोटींची निर्यात झाली, तर यावर्षी आतापर्यंत ८४१ कोटींची निर्यात झाली आहे. जिल्ह्याच्या या कामगिरीमुळे उत्कृष्ट निर्यातीसाठी दिल्या जाणाऱ्या पुरस्कारासाठी नामांकन करण्यात येणार आहे.

निर्यात वाढ होण्यासाठी साठवण क्षमता उपलब्ध करण्यासोबतच वाहतूक व्यवस्था उभारण्यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे.
जिल्ह्यात उद्योग उभारणीसाठी नवउद्योजक समोर येत आहेत. त्यांना औद्योगिक वसाहतीतील भूखंड देण्यासाठी येणारी अडचण लक्षात घेऊन सध्या रिकामे असलेले भूखंड कार्यान्वित नसल्याची खात्री करून हे भूखंड वाटप करण्याची प्रक्रिया गतीने पूर्ण करण्यात येणार आहे. तसेच रिक्त भूखंडाची माहिती त्यांच्या आरक्षणासह जिल्ह्याच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यासोबतच खामगाव, देऊळगाव राजा येथे अतिरिक्त औद्योगिक वसाहत आणि मोताळा येथे नवीन एमआयडीसी प्रस्तावित आहे. लवकरच येथील भूखंड वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाईल. तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या औद्योगिक वसाहतीमध्ये रस्ते, वीज, पाणी आदी सोयीसुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे.
जिल्ह्याच्या औद्योगिक विकासासाठी खवा आणि गारमेंट क्लस्टरची निर्मिती करण्यात आली आहे. येत्या काळात फर्निचर, वेल्डींग, अन्न प्रक्रिया यांचे क्लस्टर तयार करून या उद्योगांना गती देण्यात येणार आहे. जिल्ह्यात बचतगटही विविध उद्योगात कार्यरत आहेत. त्यांनाही या क्लस्टर योजनेत सहभागी करून उत्पादनासाठी त्यांचे सहकार्य घेण्यात येणार आहे. या उद्योगांना कुशल मनुष्यबळ मिळाव-ा, यासाठी सहकार्य करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील क्लस्टरसाठी लागणारे कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य विकासाच्या योजना राबविण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने स्थानिक गरजा लक्षात घेऊन कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणात दिव्यांग व्यक्तींनाही सामावून घेतले जाणार आहे.



जिल्ह्यातील निर्यातक्षम उत्पादनांचा शोध घेण्यात येणार आहे. गेल्या काळात सफेद मुसळीची निर्यात अधिक प्रमाणात होत आहे. याला शास्त्रोक्त आधार मिळावा यासाठी जीआय मानांकन मिळण्यासाठी प्रक्रिया करण्यात येणार आहे. तसेच इतर कृषि उत्पादनांनाही जीआय मानांकन मिळावे, यासाठी प्रयत्न करण्यात येतील. तसेच निर्यातीबाबत माहिती देण्यासाठी कार्यशाळा, जनजागृतीचे कार्यक्रम घेण्यात येणार आहे. एक जिल्हा, एक उत्पादनामध्ये कापूस आणि सीड हब निश्चित करण्यात आले आहे. बियाण्यांचे हब तयार करण्यासाठी बियाणे कंपन्यांनाही सहभागी करून घेतले जोणार आहे. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात जिल्ह्यात सर्वाधिक आर्थिक लाभ देण्यात आला आहे. उद्योग उभारण्यासाठी आवश्यक सोयीसुविधा, कुशल मनुष्यबळ पुरवठा, निर्यातीसाठी संपूर्ण सहकार्य, उत्कृष्ट दर्जाचे मानांकन मिळविण्यासाठी सहकार्य करण्यात येत आहे. जिल्हा प्रशासनाच्या एकत्रिक उद्योग विकासासाठी सकारात्मक दृष्टिकोन यामुळे जिल्ह्यात उद्योगपूरक वातावरण निर्मिती होण्यास मदत मिळणार आहे, असेही जिल्हाधिकारी डॉ. पाटील यांनी सांगितले.

# अनेक वर्षांपासुन सुलतानपुर येथे प्रवासी निवाराच नाही!

## प्रशासनाच्या अनास्थेपायी खोळंबला सुलतानपुर येथील प्रवासी निवारा प्रवाशांची होतेय गैरसोय

**जनसंचलन/ लोणार**

जागतीक दर्जाचे पर्यटन क्षेत्र असलेल्या लोणार सह अनेक महत्वपुर्ण ठीकाणी ये जा करण्यासाठी रहदारीचा केंद्र बिंदु असलेल्या सुलतानपुर येथे गत अनेक वर्षा पासुन प्रवासी निवारा नसल्याने प्रवाशांना अनेक समस्यांना सामोरे जात मोठा त्रास सहन करवा लागत आहे . सुलतानपुर येथुन जात असलेले दोन राज्यमहामार्ग तसेच स्थानिक विविध महाविद्यालये व विविध उच्चशिक्षणाची दालणे , नामांकित हॉस्पीटल ,आणि शेजारील जिल्हयाला जोडणारी रस्ते येथुन असल्याने दरदिवसी हजारो प्रवासी एसटी. बसने येथुन ये - जा करतात मात्र एसटी बस च्या प्रतिक्षेत थांबणाऱ्या प्रवाशांसाठी सुलतानपुर येथे अनेक वर्षा पासुन प्रवासी निवाराच नसल्याने प्रवाशांना मोठ्या समस्यांचा सामना करावा लागत आहे . सुलतानपुर येथुन प्रवास करण्यासाठी प्रवाशांना एस.टी. किंवा इतर खाजगी वाहने हेच साधन आहे मात्र येथील प्रवाशांना उभे राहण्या साठी कोणतीच सोय नाही त्यामुळे विदयार्थी , व्यापारी व रुग्णांणची व महिलांची प्रचंड गैरसोय होते त्यातच प्रवासी निवाराच नसल्याने बस थांबण्यासाठी निश्‍चित जागा नसल्याने प्रवाशांना बसच्या मागे धावतांना तारेवरची कसरत करावी लागते . आशातच सध्या उन्हाळ्याचे दिवस असल्याने ४३ ते ४४ डीग्री तापमान असतांना प्रवाशांना प्रचंड उष्णतेच्या लाटा अंगावर घेत सुलतानपुर येथे उघडयावर एसटी बसेस च्या प्रतिक्षेत थांबाव लागत असल्याने प्रवाशांकडून प्रचंड संताप व्यक्त



होत आहे . प्रवाशांच्या सोई साठी नेहमीच प्रयत्नशील असणाऱ्या प्रवासी संघटनेने किंवा प्रांजळपणे गावाच्या विकासासाठी कार्यकरणाऱ्या पुढाऱ्यांणी किंवा सामाजीक कार्यकर्तेनी प्रशासनाच्या अनास्थेत खितपडलेल्या सुलतानपुर येथील प्रवासी निवाऱ्या च्या समस्ये बाबत पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे

# अवैध रेती वाहतूकीला कंटाळून महीला सरपंचाने दिला आत्मदहनाचा इशारा

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील निमगाव वायाळ येथील खडकपूर्णा नदीपात्रातून लाखो ब्रास वाळू चे उत्खनन दिवसरात्र जेसीबी ने महसूल विभागाच्या आशिर्वादाने सुरू असून सदर रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप व सीसीटीव्ही फुटेज मिळण्यासाठी वारंवार अर्ज निवेदन देऊन ही महसूल विभागाने लोकप्रतिनिधी ची दिशाभूल केली असल्याचे शेवटी निमगाव वायाळ येथील महीला सरपंच सौ शिला चाटे यांनी सात दिवसांत निमगाव वायाळ येथील रेती घाटाचे तांत्रीक मोजमाप करून दोषी अधिकाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करावी अन्यथा कारवाई न झाल्यास २७ मे रोजी निमगाव वायाळ येथील रेतीघाटात आत्मदहन करण्याचा इशारा तारीख २१ मे रोजी दिलेल्या निवेदनात दिला आहे. सदर रेती घाटातील अवैध रेती उत्खनन याचे मोजमाप करून या घाटातील सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावे व अवैध रेती उत्खनन प्रकरणी




दोषी अधिकाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी यासाठी येथील महिला सरपंच यांनी तहसिलदार यांना निवेदन देऊन केली आहे तसेच सदर रेती घाटातील सात दिवसांत कारवाई झाली नसल्यास याच रेती घाटात आत्मदहन करण्याचा इशारा दिला असून या आत्मदहनास महसूल विभाग जबाबदार राहील असे निवेदनात शेवटी म्हटलं आहे. महसूल विभागाने कर्मचारी फक्त या घाटात येऊन अर्थ पुर्ण व्यवहार करून निघून जातात मात्र कारवाई करीत नसल्याने या रेती तस्कराने मुजोरी वाढली असून महसूल विभागाच्या आशिर्वादाने माझ्या जिवाला व कुटुंबाला धोका निर्माण झाला असून माझ्या कुटुंबावर कुठल्याही वेळी हल्ला होऊ शकतो जर माझ्या जिवाला व कुटुंबालाही काही धोका झाल्यास याला रेती तस्कर व महसूल विभागातील कर्मचारी जबाबदार धरावे अशी माहिती महीला सरपंच शिला रामेश्वर चाटे यांनी दिली

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह प्रवेश पक्रिया सुरू...

**जनसंचलन/लोणार**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, बुलढाणा जिल्हे बुलढाणा यांचे अधिनस्त् लोणार येथे सन २०११-१२ पासुन सुरु असलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह लोणार येथे शासकीय वसतीगृहात सन २०२४-२५ करीता मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी प्रवर्गनिहाय आरक्षित जागेवर टक्केवारीनुसार अनुसूचित जाती-८०% अनुसूचित जमाती-३% वि.जा.भ.ज-५% दिव्यांग ३% अर्थिकदृष्टया तसेच इतर मागासप्रवर्ग-५% विशेष मागासप्रवर्ग-२% अनाथ-२% इत्यादी प्रवर्गातील शालेय, कनिष्ठ महाविद्यालयीन, वरीष्ठ महाविद्यालयीन, व्यावसायीक शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी सन २०२४-२०२५ करिता शासकीय वसतीगृहात दिनांक: ०१ मे २०२४ पासुन विनामुल्य प्रवेश अर्ज वितरण सुरु आहे. तरी विनाविलंब जास्तीत जास्त् मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी वसतीगृहात प्रवेश घ्यावा याबाबतचे आवाहन वसतीगृहाचे प्र. गृहपाल एस.बी.मुंढे यांनी केले आहे.

# सुलतानपुर ग्रामपंचायतीचा कारभार रामभरोसे सरपंच गैरहजर...



**जनसंचलन/ लोणार**

सुलतानपूर येथील ग्रामपंचायतीचा अनागोंदी कारभारामुळे नागरिक त्रस्त झाले आहेत तर दुसरी कडे १५ दिवसांपासून सरपंच ग्रा.प. कडे फिर लेच नाही तर दि २१ मे रोजी ग्रा.प. ग्रामविकस अधिकारी गजानन कावरखे हे देखील गैरहजर आहेत त्यामुळे सकाळी ९.४५ वा . शिपाई मारोती अवचार हा एकमेव कर्मचारी कार्यालयात आढळला . त्यानंतर हि बाब ग्रामविकास अधिकारी कावरखे यांना विचारली असता त्यानतर हळूहळू - एक एक कर्मचारी ग्रा.प. कार्यालयात हजर होवू लागला. तसेच रोजगार सेवक दिलीप मसुरे हा तर १२ वाजता कार्यालयात आला त्यामुळे ग्रा.प अधिकारी व सरपंच यांच्या मनमानी कारभारामुळे नागरिक त्रास होत आहे आज विविध ग्रा.प. च्या कामासाठी आलेल्या नागरिकांना काम न झाल्या ने खाली हाताने परतावे लागले तसेच गावाच्या विविध विकास कामासा ठी सरपंच किरण लाहोटी यांची वर्णी लागली होती परंतु सरपंच लाहोटी यांच्या वेळकाढू धोरणामुळे ग्रा.प. साठी सरपंच वेळ देत नाही . आजरोजी पंधरा दिवसांसुन सरपंच ग्रा.प. कार्यालया कडे फिरकलेच नाहीं त्यामुळे सामान्य नागरिकाना दाखल्या साठी त्रास होत आहे तसेच गावातील विविध समस्या चा निपटारा होत नाहीं . त्यामुळे नागरिकां कडून रोष व्यवत होत आहे तरी याबाबत वरिष्ठांनी लक्ष देवून गैरहजर सरपंच यांना समज दयावा व गैहजर ग्रामविकास अधिकारी गजानन कावरखे यांची चौकशी करावी अशी मागणी होत आहे

# अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार...

**जनसंचलन/मलकापूर**

अज्ञात वाहनाच्या धडकेत ३३ वर्षीय दुचाकीस्वार ठार झाला. ही घटना मलकापूर बोदवड मार्गावर सोमवारी घडली. नितेश भालचंद्र हिवराळे (वय ३३) असे मृतकाचे नाव आहे.नितेश भालचंद्र हिवराळे हे रविवारी रात्री १० वाजताच्या सुमारास मलकापूर - बोदवड रस्त्याने जात होते. त्यांच्या




दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यामुळे नितेश गंभीर जखमी अवस्थेत खाली कोसळले. यामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पाईप लाईन लिकीज मूळे गटारे तुंबून नागरीकांचे आरोग्य धोक्यात...

## साथीचे रोग डोके वर काढणार ग्रामपंचायत सचिवाचे दुर्लक्ष

**जनसंचलन/ सिंदखेडराजा**

सिंदखेडराजा तालुक्यातील बाळ समुद्र येथील वार्ड क्रं १मधिल पाणी पुरवठा जलवाहिनी वरील वाल लिकीज झाल्यामुळे उन्हाळ्यात पाण्याची समस्या जाणवत असताना.भरपुर प्रमाणात पाण्याची नासाडी होऊन.त्या ठिकाणी मोठ मोठी गटारे तुंबून मच्छर .डास व पाण्याची दुर्गंधी पसरत असून.रात्रीच्या वेळी लाईट चा लपंडाव सुरू असतो.त्या वाल मधुन येणार पाणी नागरीकांना वापरावे लागते.त्यामुळे नागरांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता आहे. बाळ समुद्र येथील ग्रामपंचायत चे सचिव यांना वारंवार तोंडी सांगुन ही दुर्लक्ष करीत होते.व त्यांना लेखी



निवेदन देऊन ही अद्याप पर्यंत कुठलीही प्रकारची कारवाई केली नाही. पाईप लाईन वाल लिकीज झाल्यामुळे एकीकडे पाण्याची नासाडी होत आहे . तर गटारे तुंबून नागरीकांच्या आरोग्य धोक्यात येऊ नये यासाठी ग्रामपंचायत सचिव यांना संजय धोंगडे यांनी दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे.

# मराठा आरक्षणासाठी झटणारे मनोज जरांगे पाटील यांचा प्रवास आता रूपेरी पडद्यावर...

## अभिनेते रोहन पाटील यांनी साकारली मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका

**जनसंचलन/बुलढाणा**

मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी संघर्ष करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या आयुष्याचा वेध घेणारा संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील हा चित्रपट येत्या २१ जुन ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होण्यासाठी आता सज्ज झाला आहे. या चित्रपटाचा मुहूर्त हा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे करण्यात आला होता आणि आता या चित्रपटाच्या प्रमोशनला सुरुवात करण्यात आली आहे. शिवाजी दोलताडे यांनी या चित्रपटाच्या दिग्दर्शनाची जबाबदारी निभावलेली असून सोनाई फिल्म क्रिएशन या निर्मिती संस्थेच्या गोवर्धन दोलताडे यांनी चित्रपटाच्या निर्मितीसह चित्रपटाचं लेखनही केलं आहे. सहनिर्माते रामदास मेदगे, विठ्ठल अर्जुन पचपिंड ,जान्हवी मनोज तांबे, दत्तात्रय लोहकरे ,कार्तिक दोलताडे पाटील , नर्मदा सिनेव्हिजन्स हे आहेत. तर डॉ.सुधीर निकम यांनी संवाद आणि पटकथा लिहिली आहे. या चित्रपटात मनोज जरांगे पाटील यांची मध्यवर्ती भूमिका अभिनेता रोहन पाटील यांनी साकारली आहे. संघर्षयोद्धा हा माझा पहिलाच बायोपिक आहे. याआधी मी मुसंडी, मजनू , खळगं असे चित्रपट दिग्दर्शित केले आहेत. एखाद्या काल्पनिक गोष्टींवर चित्रपट बनवणे हे जरा सोपे असते कारण त्यात आपण काही गोष्टी या जोडू शकतो परंतु एखाद्या चालू




घडामोडींवर चित्रपट हे तेवढेच कठीण असते. त्यामुळे हा चित्रपट बनवणे माझ्यासाठी मोठे चॅलेंज होते. पण वेळोवेळी मला स्वतः मनोज जरांगे पाटील यांनी आणि त्यांच्या टीमने योग्य ती मदत केली हे मी नक्कीच नमूद करू इच्छितो. आणि त्यामुळेच हे मी शिवधनुष्य पेलू शकलो असे दिग्दर्शक शिवाजी दोलताडे यांनी सांगितले. मी स्वतःला खुप भाग्यवान समजतो की मनोज जरांगे पाटील यांची व्यक्तिरेखा मला करायला मिळाली. आजवर अनेक वेगवेगळ्या चित्रपटातून मी भूमिका मी केल्या आहेत पण या चित्रपटातील ही व्यक्तिरेखा मला खुप काही देऊन गेली आहे. संघर्षातून उभे राहून आज ते एका वेगळ्या उंचीवर पोहचलेले आहेत. त्यांचे हावभाव आणि अन्य गोष्टींचा मी बारकाईने अभ्यास केला आहे आणि त्यांची सुद्धा मला तेवढीच साथ लाभली आहे. त्यांचा हा प्रेरणादायी प्रवास नक्कीच बघण्यासारखा आहे आणि सर्व समाजातील लोक हा चित्रपट नक्कीच जाऊन पाह-तील अशी मला खात्री असल्याचे अभिनेता रोहन पाटील यांनी सांगितले मनोज जरांगे पाटील यांचा संघर्ष हा खडतर असून संपूर्ण जगाला समजावा यासाठी मी या चित्रपटाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला. केवळ व्यक्तीसाठी न लढता समाजासाठी आज ते लढत आहेत ही छोटी गोष्ट नाही. त्यांनी आजवर अनेक उपषोण केली हार मानली नाही. माझे मी भाग्य समजतो की या चित्रपटाची निर्मिति करण्याची सुवर्णसंधी मला मिळाली असे चित्रपटाचे निर्माते गोवर्धन दोलताडे यांनी सांगितले काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाच्या टीज़रला आणि चित्रपटाची गाणी सोशल मीडियावर तुफान प्रतिसाद मिळवत आहेत , सुप्रसिद्ध गायक अजय गोगावले यांच्या सुमधुर आवाजातील ह्रदयाला भिडणाऱ्या उधळीन जीव... या गीताने रसिक प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले आहे. या चित्रपटात अभिनेता संदीप पाठक, सागर कारंडे, अरबाज शेख, अभिनेते मोहन जोशी, श्रीनिवास पोकळे, संजय कुलकर्णी, अभिनेत्री सुरभी हांडे, माधवी जुवेकर, विजय मिश्रा, विनीत भोंडे, सुनील गोडबोले, माधव अभ्यंकर, सोमनाथ अवघडे , किशोर चौगुले , सिद्धेश्वर झाडबुके, उर्मिला डांगे यांच्या ही प्रमुख भूमिका आहेत.

# खामगाव शहरात एकाच रात्री सात ठिकाणी चोरी



**जनसंचलन/ खामगाव**

शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील एकाच रोडवरील दोन प्रमुख वस्त्यांमध्ये सात ठिकाणी चोरी झाल्याचा धक्कादायक प्रकार उजेडात आला. मंगळवारी मध्यरात्री ते पहाटेच्या कालावधीत चोरट्यांनी अनेक घरांना लक्ष केले. त्यामुळे खामगाव शहरा-तील कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आल्याचे चित्र आहे. शहर पोलिस स्टेशनच्या हद्दीतील अमृतनगर भागात दोन ठिकाणी, तर वाडी परिसरात पाच ठिकाणी चोरी झाल्याचे मंगळवारी उघडकीस आले. एकाच वस्तीत पाचपेक्षा अधिक चोऱ्या झाल्याने चोरट्यांना पोलिसांचा धाक राहिला की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. प्राप्त माहितीनुसार शहरातील अमृतनगर भागातील वाडी भागातील वृंदावन नगरातील श्रीकृष्ण पांडुरंग धानखेडे (३९) बाहेरगावी असल्याची संधी साधून चोरट्यांनी त्यांच्या घरातन तब्बल ५० हजारांचा ऐवज लंपास केला. त्याचवेळी त्यांचे भाडेकरू असलेल्या रमेश वानखडे ४० यांच्या घरातील सुमारे ३५ हजारांचा मुद्देमाल चोरट्यांनी चोरून नेला. त्याचवेळी वाडी परिसरातील प्रा. प्रशांत सरोदे मॉर्निंग वॉकसाठी गेले असताना चोरट्यांनी त्यांच्या घरातून रोख २५ हजार लंपास केले. वाडी भागातील अनंता धुमाळे यांच्या घरातही चोरट्यांनी हात साफ केला. अमृत नगर भागातील चिन्मय अंजनकर व आणखी एका घरा-तील ऐवज चोरट्यांनी लंपास केला. एकाच रस्त्यावरील सात ठिकाणी चोरी झाल्यामुळे पोलिसांच्या कार्यकुशलतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. अमृत नगरातील घरांतून किती रुपयांचा ऐवज चोरीला गेला. याबाबत निश्चित माहिती मिळू शकली नाही. याप्रकरणी पुढील तपास शहर पोलिस करीत आहेत. किती मुद्देमाल चोरीस गेला याबाबत माहिती मिळू शकली माही. एकाच रात्रीत एकाच रस्त्यावर ७ ठिकाणी अज्ञात चोरट्यांनी धमाकळ घातला.

# हॉटेल मालकाच्या सतर्कतेमुळे सोने चोरणाऱ्या महिला पोलिसांच्या जाळ्यात...

**वृत्तसंस्था/दुसरबीड**

कमत पूर्ण कारंजा के एसटी बसमधील एका प्रवासी महिलेकडील अडीच तोळ्याचे सोन्याचे गंठण चोरी झाले होते. दुसरबीडजनीक बसमधील प्रवासी नाश्ता करण्यासाठी थांबले असता चार महिलांनी पलायन केले. ही बाब संशयास्पद वाटल्याने हॉटेलचालकाने पाठलाग त्या महिलांचा पाठलाग केला. अखेर चोरी करणाऱ्या त्या चार महिलांना पकडण्यात पोलिसांना यश आले. दरम्यान, या महिला सराईत गुन्हे-गार असल्याचे तपासात समोर आले आहे. दुसरबीड येथील एका हॉटेलवर पुणे-कारंजा महामंडळाची बस




प्रवाशांच्या चहा, नाश्त्यासाठी दि. २१ मे रोजी सकाळी थांबली होती. त्यावेळी या बसमधून चार महिला लहान मुलांसह खाली उतरल्या आणि एका ऑटोद्वारे निघून गेल्या. ही बाब हॉटेलमालक अमोल भोसले यांना संशयास्पद वाटली. तेव्हा त्यांनी बसमधील प्रवाशांना त्यांचे सामान तपासण्याचे सांगितले. तेव्हा एका. महिलेकडील अडीच तोळ्याचे गंठण चोरीला गेल्याचे स्पष्ट झाले. त्यामुळे त्या महिलेस घेत संबंधित ऑटोचा पाठलाग करत त्या महिलांना थांबविण्यात आले असता त्यांच्याकडे सोन्याचे गंठण सापडले. त्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# शिंदी ते साखरखेर्डा रस्त्यावर अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पकडले।

जनसंचनलन/सिंदखेडराजा

अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहनांना रोज कुठे ना कुठे सिंदखेडराजा तालुक्यामध्ये पकडल्या जात असून उपविभागीय अधिकारी प्राध्यापक संजय खडसे यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध रेती वाहतूक करणाऱ्या वाहन मालकाला मात्र चांगलाच धक्का बसत आहे, २१ मे च्या रात्री १० वाजून २० मिनिटांनी मध्य रात्र ही झाली नसताना शिंदी ते साखरखेर्डा रस्त्यावर अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर शिंदी येथून साखरखेर्डा मार्गाने जात असताना महसूल पथकाने सदर अवैध रेती वाहतूक करणारे टिप्पर पकडले,टाटा कंपनीचे पेपर असून टिप्पर चा क्रमांक - २८ ७४८९ असून सदर टिप्पर सिनखेडराजा तालुक्यातील तांदूळवाडी येथील मनोज चेके यांचे असल्याचे समजते, टिप्पर मध्ये दोन ब्रास रेती आढळून आली असून रेती वाहतूक परवाना चौकशी केली असता चालकाकडे आढळून आला नाही,त्यामुळे सदर टिप्पर व रेती जप्त करण्यात आली असून टिप्पर साखरखेर्डा पोलीस स्टेशनमध्ये जमा करण्यात आली आहे तहसीलदार सिंदखेडराजा हे आल्यानंतर टिप्परवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल सदर कारवाई संजय शिंगणे तलाठी साखरखेर्डा व लखन



राजपूत तलाठी शिंदी यांनी केली असून अवैध रेती वाहतूक करणाऱ्यांचे मात्र चांगलेच दमछाप झाली आहे

# नूतन ज्युनियर कॉलेजचा ९४.२४ निकाल प्रावीण्य श्रैणीत मुली अव्वल स्थानावर

जनसंचलन/ सिंदखेडराजा

किनगाव राजा येथील नूतन कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल ९४.२४ / टक्के असून उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे विज्ञान शाखेमधील कुमारी देशमुख आदिती व कु. वाघ आर्या या दोघींनी ८७% गुण मिळवून कॉलेजमधून प्रथम क्रमांक पटकावला तसेच कु.बकाल स्वामिनी ने ८४/टक्के घेऊन दुसरा क्रमांक मिळवला आणि कु. राजनंदिनी शिंगणे येणे ८३. ८४ टक्के गुण मिळवून तिसरा क्रमांक मिळवला आहे विज्ञान शाखेमध्ये प्राविण्य श्रेणी १७ आणि प्रथम श्रेणीमध्ये ९१ तर द्वितीय श्रेणीमध्ये २४ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले तसेच कला विभागातून कुमारी उषा काळे हिने ७५ टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक मिळवला असून द्वितीय



क्रमांक मोनिका आवारे ६८% गुण मिळाले तर तृतीय क्रमांक कुमारी जान्हवी देशमुख ६३ टक्के गुण मिळाले असून कला शाखेमध्ये प्राविण्यश्रेणीत १ प्रथम श्रेणीमध्ये ६ द्वितीय श्रेणी मध्ये ९ असून प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांचे शाळा महाविद्यालयाचे प्राचार्य सतीश जाधव व त्यांचे सहकारी प्राध्यापक वर्ग व शिक्षक वृंद यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले

# सलोखा योजनेत मुद्रांक शुल्क, नोंदणी शुल्क माफ

जनसंचलन/बुलढाणा

शेतजमिनीचा ताबा आणि वहिवाटी बाबत शेतकऱ्यातील आपसातील वाद मिटविण्यासाठी राज्यात सलोखा योजना राबविण्यात येत आहे. परस्परांमधील शेत जमिनीचा ताबा परत मुळ मालकाकडे करण्यासाठी या सलोखा योजनेतून नाममात्र एक हजार रूपयात दस्त नोंदणी होणार आहे. शेतजमिनीच्या वहिवाटी वरून वाद होतात. यावर उपाययोजना म्हणून हे वाद मिटविणे आणि समाजात सलोख्याचे वातावरण निर्माण करण्यासाठी सलोखा योजना प्रभावी ठरणार आहे. यामुळे एकमेकांमधील सौख्य आणि सौहार्द वाढीस लागण्यासाठी एका शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा दुसऱ्या शेतकऱ्याकडे किंवा दुसऱ्या शेतकऱ्याच्या नावावरील शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतजमिनी धारकांचे अदालाबदल दस्तांसाठी मुद्रांक शुल्क नाममात्र एक हजार रूपये आणि नोंदणी शुल्क एक हजार रूपये आकारण्याचा निर्णय ३ जानेवारी २०२३ पासून घेण्यात आला आहे. सलोखा योजनेमुळे शेतजमिनीचा ताबा पहिल्या शेतकऱ्याकडे असणाऱ्या शेतकऱ्यांची जमीन अदलाबदल नंतर क्षेत्र ज्याचे त्याचे नावे होतील. शेतजमिनीचा कागदोपत्री ताबा मिळाल्याने शेतकऱ्यांना विहिर, शेततळे, पाईपलाईन, वृक्ष व फळबाग लागवडीबाबत शासनाच्या विविध योजनांचा फायदा होऊ शकणार आहे. शेतकऱ्यांच्या आपसातील वादामुळे अनेक शेतजमीन पडीक राहतात. वाद मिटल्यास शेतजमिनीच्या लागवडीखालील व वहितीखालील क्षेत्रात वाढ होऊन उत्पादनात वाढ होईल. सलोखा योजना राबविली तर अशा परस्परविरोधी ताब्याबाबत असलेली विविध न्यायालयतील प्रकरणे निकाली निघणार आहेत. ही योजना दोन वर्षांपर्यंत लागू राहणार आहे. एकाच गावात जमीन धारण करणाऱ्या शेतकऱ्यांचे परस्परांकडे मालकी आणि ताबा असल्याबाबतचा पंचनामा मंडळ अधिकारी आणि तलाठी यांनी करुन दस्त नोंदणीच्या वेळी दस्तासोबत जोडणे बंधनकारक आहे. जमिनीच्या दोन्ही बाजूकडील क्षेत्रफळात कितीही फरक असला तरी योजनेत पात्र मात्र दोन्ही पक्षकार सर्व संमतीने हा अदलाबदल दस्त नोंदवित असल्याची अट दस्तामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे. या योजनेमुळे आपसातील पिढीजात वैरभावना संपुष्टात येऊन ताबा आणि मालकीबाबतचा संभ्रम नष्ट झाल्यामुळे सकारात्मक मानसिकता होऊन जमिनीच्या विकासाला चालना मिळणार आहे. तसेच शेतकऱ्याचे वैयक्तिक आणि राष्ट्रीय उत्पादनात वाढ होऊन न्यायालयांमध्ये प्रलंबित दावे निकाली निघून शेतकरी, न्यायालय आणि प्रशासनाचा वेळ आणि खर्च वाचणार आहे. जिल्ह्यातील शेतजमीन मालकी हक्काबाबत होणारे वाद कमी करणेसाठी शेतकऱ्यांनी सलोखा योजनेचा लाभ घ्यावा, ही योजना शेतकऱ्यांच्या हिताची असल्यामुळे योजनेचे निकष पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन वाद मिटवून सामाजिक सौख्य आणि सौहार्द वाढविण्यास हातभार लावावा, योजनेचा लाभ घेण्यासाठी तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# लाख रुपये खर्च केले पण गावाला पाणी नाही आले मुरादपूरचा पाणी प्रश्न पेटणार

जनसंचनलन/ चिखली

तालुक्यातील मौजे मुरादपुर ता चिखली जि बुलढाणा मतदार संघ सिंदखेडराजा येथे पाणि टंचाई निवारणासाठी आतापर्यंत शासणाचे लाखो नाही कोरोडो रुपये खर्च होवुन ही गावातील पाणीटंचाई जैसै थे आहे तरी २००९मधे महाजल योजना गावासाठी सुरु झाली पण एक थेंब ही पाणी गावात आणु शकली नाही तक्रारी झाल्या परंतु ठेकेदार व पाणीपुरवठा कर्मचारी यांनी त्यांच्या आर्थीक फायद्यामुळे कोणतीही चौकशी न करताच दुसरी पेयजल योजना सन २०१४मधे सुरू केली त्यामधे सुध्दा चौकशी न करताच परस्पर निधी काढुन ठेकेदार व सरपंच अधिकारी यांनी पाणी मुरविले सदर कर्मचारी ईंजीनीयर अधिकारी येवढ्यावरच न थांबता त्यांच्या टक्के वारी साठि गावाची पर्वा न करता गावकर्यांना विश्वासात न घेता जलजीवन मिशन योजना मंजुर करण्यात आली व सदर योजणे बाबत विविध तक्रारी करुन सुध्दा तक्रारीची दखल न घेता व चौकशी न करताच ठेकेदार व सरपंच व पती यांच्या आर्थिक लाभासाठी सदर योजणा कोणत्याही स्वरुपाचे प्रयोजन नसताना केवळ आर्थिक लाभासाठी सदर योजना मंजुर करण्यात आली आहे वेळोवेळी तक्रार दाखल केली असता सदर विभागातील अधिकारी कर्मचारी यांनी आजपर्यंत कोणत्याही प्रकारची चौकशी केली नाही तरी मुरादपुर येथे आज रोजी भिषण पाणिटंचाई आहे तसेच ग्रां प अंतर्गत गावात काही धनदांडग्या



लोकांनी त्यांच्या वैयक्तिक पाईप लाईन टाकुन घरी पाणी आणले आहे परंतु गोर गरीब जनतेला भिषण पाणिटंचाई चा सामणा करावा लागत आहे व ग्रा प ठेकेदार आता डोळे मिटून शांत आहे परंतु गरीब जनतेला याच्या झळा सोसाव्या लागत आहे तर सचिव यांनी ठेकेदार व अधिकारी कर्मचारी यांच्या फायद्यासाठी बोगस ग्रामसभा घेऊन जो कारणामा केला तसा पाणीटंचाई साठी काही सुचते का येव्हढा प्रश्न गावातील सर्व सामान्य नागरिकांना पडलेला आहे व महाजल व पेयजल जलजीवन मिशन योजणेचे पाणी नेमके कुठे मुरले याची व अधिकारी कर्मचारी ईंजीनीयर व सरपंच यांची चौकशी व्हावी व मुरादपुर येथील आजपर्यंत न अनुभवलेली भिषण पाणिटंचाई यावर पाणिपुरवठा अधिकारी यावर काही उपाय करताता का याकडे सर्व सामान्य नागरिकांना पडलेला प्रश्न आहे तरी सदर महाजल व पेयजल व जलजीवन मीशन या मधे झालेल्या अनलीगल कामाची व भ्रष्टाचाराची चौकशी व्हावी व दोषींवर कारवाई व्हावी सर्व सामान्य नागरिकांची ईच्छा व विष्णु महाराज गाडेकर उपसरपंच यांनी केलेल्या वेळोवेळी तक्रारीची दखल घेऊन गावकर्यांच्या पाण्याचा प्रश्न मिटवुन ठेकेदार व अधिकारी कर्मचारी ईंजीनीयर यांची चौकशी व्हावी व कारवाई करावी अशी मागणी मुरादपुर उपसरपंच विष्णु महाराज गाडेकर यांनी वेळोवेळी केली आहे